VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २६. राष्ट्रविकासासाठी गोपालकृष्ण गोखलेच्या विचारांची गरज

**प्रा. डॉ. सुनिता कलाखे**
श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालय, चिखली जि. बुलडाणा.

**१. प्रस्तावना**

भारतीय विचारवंताच्या आर्थिक,समाजिक,राजकिय विचारांची प्रासंगिकता आणि उपयोगिता अभ्यासनेच नव्हे , तर अंगिकारने अत्यंत महत्वाची आणि सद्यस्थिती गरज निर्माण झाली आहे. देशाची सद्यस्थिती बघितली असता आर्थिक विचाराची नव्हे तर विचार जगणाऱ्या अर्थतज्ञाला देश ब्रेनड्रेन मुळे मुकत असल्याचे चित्र आपणास दिसून येत आहे. नालंदा विद्यापीठाचे कुलगुरू अर्थतज्ज्ञ नोबेल पारितोषिक विजेते एकमेव भारतीय अर्थतज्ज्ञ राजीनामा देऊन अमेरिकेत परतले आहे. त्या पाठोपाठ रिझर्व्ह बॅकेचे गर्व्हनर डॉ. रघुनाथ राजन , निती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ.अरविंद पनपगारिया आणि काल परवा कालवधी पूर्ण होण्याच्या अगोदर रिझर्व्ह बॅकेचे गर्व्हनर आणि डेप्टी गर्व्हनर यांनी एकाचवेळी राजीनामा देऊन कोलंबिया विद्यापीठात शिक्षक म्हणून राहणे पसंत केली आहे. देशाची अर्थव्यवस्था नोंटबंदीनंतर रूळावर आणल्यावर तिला धावायला लावायला लावणे सोडून अर्धाकालावधीतून एकादा अर्थ तज्ज्ञ सोडून जातो यांचा अर्थ अर्थशास्त्राच्या विद्यार्थी नव्हे सामान्य नागरिकांना कळतो. भारतीय नागरीक भारतीय अर्थतज्ज्ञांचे विचारांचे स्लोगन घेऊन सोशल मिडीयावर प्रगट झाल्याचे चित्र आपण अनुभवतो आहे. भारतीय विचारवंताचा भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीसाठी विचार अनुभवले तर त्यांची प्रासंगिकता आणि उपयोगिता आज खुप मोठया प्रमाणात असल्याचे आपणांस दिसून येईल.यामध्ये कौटील्य , दादाभाई नौरोजी , महादेव रानडे ,रामेशचंद्र दत्त,गोपालकृष्ण गोखले,महात्मा गांधी,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,इत्यादी समाजसुधारकांच्या आर्थिक विचाराची गरज निर्माण झाल्याचे दिसून येते. प्रस्तूत संशोधन पेपर मध्ये गोपालकृष्ण गोखले यांचे देशाच्या आर्थिक विचारांचा परामर्ष केला आहे.

**२. श्री.गोपालकृष्ण गोखले अल्प परिचय**

१८९९ मध्ये मुंबई विधान सभेचे सदस्य म्हणून राजकारणामध्ये प्रवेश. १९०१ ला व्हाईसरॉय कार्यकारीणी परिषदेचे सदस्य इ.स.१९०५ ला भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून निवडल्या गेले.१९०८ मध्ये Ranade Economic Institute ची स्थापना केली. १९०२ पर्यंत पूण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी कार्य केले.गोखले रानडे आणि दादाभाई नौरोजी यांना आपली गुरू मानीत सार्वजनिक जिवनाचे व राजकराणाचे धडे त्यांनी यांच्याकडूनच घेतली पुढे महात्मा गांधीनी गोपालकृष्ण गोखलेना आपले राजकीय गुरू मानले.

**३. गोखले यांचे आर्थिक विचाराची आजच्या काळात अयोगिता**

कमीदराने शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देणे,त्यांचा शेतसारा नेहमीकरिता खालच्या पातळीवर निर्धारित करणे,त्यांच्या शेतीकरिता बारमाही पाणीपुरवठयाची सोय करणे हया सूचना त्यांनी शंभर वर्षापुर्वी केल्या आहेत आजतागायत



Scanned with CamScanner